**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २७ जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांचं अभिभाषण- समाजातील सर्व वर्गांच्या उत्थानासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रतिपादन.**
- **विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनास आजपासून मुंबईत प्रारंभ.**
- **आर्थिक पाहणी अहवालात गेल्या आर्थिक वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेतली वाढ ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असल्याचा अंदाज; दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात ६ व्या स्थानी.**
- **सर्वसामान्य ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येणार नसल्याची महावितरणची माहिती.**
- **गडचिरोली इथं दोन जहाल नक्षली महिलांचं आज पोलिसांपुढे आत्मसमर्पण.**

*****

राष्ट्रपती अभिभाषण

गरीब, शेतकरी, दीनदुबळे आणि महिलांचंउत्थान झालं, तरच देश विकसित होतो, त्यामुळे या वर्गाच्याउत्थानासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे.आजपासून राज्यसभेच्याअधिवेशनाला देखील सुरुवात झाली. तत्पूर्वी राष्ट्रपतींनी संसदेच्यादोन्ही सभागृहांतील सदस्यांना संबोधित केलं. देशात नुकत्याच पारपडलेल्या लोकसभा निवडणुकीची जगात चर्चा होत आहे. या निवडणुकीत महिलांचा सहभाग महत्वाचाठरला असून जम्मू काश्मिरमध्येयंदा झालेलं विक्रमी मतदान हे देशाच्या शत्रूंना चोख प्रत्यूत्तर असल्याचं त्यांनीम्हटलं आहे.राज्यांचा विकास करून देशाचा विकास हाच ध्यास आपल्या सरकारचा ध्यास असून, आज भारत जगाच्या विकासात १५ टक्यांचं योगदान देत आहे असं त्या म्हणाल्या. भारताला जागतिक स्तरावर तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनविण्याच्या दिशेनं काम होत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. 'इज ऑफ डूइंग बिजनेस' धोरणामुळे रोजगार आणि व्यवसायाच्या संधि वाढत आहे असं देखील त्या म्हणाल्या. पेपर फुटीप्रकरणीसरकार ठोस उपाययोजना करत आहे आणि या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी केली जाईल, तसंच संसदेनं पेपरफुटीसंदर्भातकायदा बनवला आहे,असही राष्ट्रपतींनी सांगितलं. राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेचं आजचं कामकाज तहकूब झालं. राज्यसभेचं कामकाज सुरु झाल्यावर पंतप्रधान

नरेंद्र मोदी यांनी सभागृहाला नवीन मंत्र्यांची ओळख करून दिली. नंतर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

पावसाळी अधिवेशन सुरवात

राज्य विधिमंडळाचं पावसाळीअधिवेशन आजपासून सुरू झालं. विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांनी दिवंगत सदस्यांचा शोकप्रस्ताव मांडला. विधानसभेत दिवंगत सदस्यांना यावेळी सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली. दिवंगत सदस्यांच्या कार्याला यावेळी अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांनी उजाळा दिला. तत्पूर्वी, विरोधी पक्षांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आजआंदोलन केलं. शेतकऱ्यांना कर्जमाफी तसंच विजबिल माफी, नैसर्गिक आपत्तींची नुकसान भरपाईद्यावी आदी मुद्दे उपस्थित करून विरोधकांनी सरकारविरोधात घोषणा दिल्या. विधानसभेचेविरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, कॉंग्रेस नेते पृथ्विराज चव्हाण, आमदार भाई जगताप, रवींद्र धंगेकर आणिइतरांनी विविध मुद्द्यांवरून सरकारचा निषेध केला.दरम्यान, राज्य सरकारला शेतकऱ्यांच्यासमस्यांशी काहीही देणंघेणं नाही, असा आरोप विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी यावेळी केला. तर निवडणुकीआधी या सरकारनं राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करून त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी वार्ताहरांशी बोलताना केली. विधीमंडळ पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन विविध विषयांना स्पर्श केला. राज्यात या सहा महिन्यांत १ हजार ४६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. एकट्या अमरावती जिल्ह्यात रोज एक शेतकरी आत्महत्या करत आहे. याकडे सरकार संवेदनशीलतेने बघत नाही. आजही काही गावात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. पीकविमा शेतकऱ्यांना मिळत नाही. पोलीस भरतीमध्ये येणाऱ्या मुलांना कोणत्याही सोयीसुविधा दिल्या जात नाहीत. राज्यात ड्रग्जचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. यावर सर्वच पक्षांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. तसंच राज्यात ओबीसी आणि मराठा आंदोलनाचा जो प्रश्न आहे त्यावर सर्वमान्य तोडगा निघणार असेल तर आम्ही सरकारच्या सोबत आहोत असंही ठाकरे म्हणाले. मध्य प्रदेशच्या लाडकी बहिण योजनेसोबतच लाडका भाऊ अशी योजना देखील सरकारनं सुरु करावी अशा सूचना त्यांनी केल्या आहेत.

विधान परिषद

विधान परिषदेत आज  राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर मांडण्यात आला. प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना तसंचमहाराष्ट्र राज्य

कौशल्य विद्यापीठासंबंधीचे अध्यादेश सरकारनं पटलावर मांडले.दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या महाराष्ट्र पोलीस सुधारणा विधेयक २०२४,मुंबई महानगरपालिका सुधारणा विधेयक २०२४, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ सुधारणा विधेयक २०२४,महाराष्ट्र सहकारी संस्था दुसरी सुधारणा विधेयक २०२४, महाराष्ट्र विनियोजन लेखानुदान विधेयक २०२४, महाराष्ट्र महानगरपालिका सुधारणा विधेयक २०२४ आणि महाराष्ट्र कामगार कल्याण निधी सुधारणा विधेयक२०२४ या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचं जाहीर करण्यात आलं. त्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी प्रसाद लाड,विलास पोतनीस, अमोल मिटकरी, अभिजीत वंजारी आणि मनीषा कायंदे या सदस्यांची सभापती तालिकेवर नामनियुक्ती केली.

आर्थिक पाहणी अहवाल

गेल्या आर्थिक वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेतली वाढ ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असा अंदाज आर्थिक पाहणी अहवालात वर्तवण्यात आला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्याच्या स्थूल उत्पन्नात ९ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची वाढ झाली होती. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज दोन्ही सभागृहांच्या पटलावर हा अहवाल मांडला. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ८ पूर्णांक ८ दशांश टक्के तर कृषी क्षेत्रात सर्वात कमी १ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ गेल्या आर्थिक वर्षात झाली. उद्योग क्षेत्राचा वाढीचा दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असण्याचं पूर्वानुमान आहे. गेल्या आर्थिक वर्षात राज्याचं सांकेतिक स्थूल उत्पन्न ४० लाख ४४ हजार २५१ कोटी रुपये अपेक्षित आहे. त्या आधीच्या आर्थिक वर्षात तुलनेत त्यात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक आहे, असं या अहवालात नमूद आहे. गेल्या आर्थिक वर्षात दरडोई राज्य उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल असा राज्य सरकारचा अंदाज आहे. इतर राज्यांच्या तुलनेत दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात ६ व्या स्थानी आहे. तर परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र गेल्या आर्थिक वर्षातही पहिल्या स्थानी राहिला आहे.

महावितरण

महावितरणतर्फे स्मार्ट मीटर बसविण्याच्या योजनेत सबस्टेशनमधील सर्व फीडर तसेच वितरण ट्रान्सफॉर्मर आणि सर्व सरकारी कार्यालयांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. तथापि, सर्वसामान्य ग्राहकांना मात्र प्रीपेड स्मार्ट मीटर

बसविण्यात येणार नाही. प्रीपेड स्मार्ट मीटरला अनेक संस्था आणि संघटनांनी विरोध दर्शवला होता. त्या प्राश्वभूमीवर महावितरणने प्रसिद्धी पत्रक जारी केलं आहे. दरम्यान महावितरणनं  महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनंतर ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेमध्ये वाहिन्यांचे विलगीकरण, वितरण हानी कमी करणे, वितरण प्रणालीचं सक्षमीकरण आणि स्मार्ट मिटरिंग यांसारखे कार्यक्रम हाती घेतले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील ग्राहकांना विश्वासार्ह आणि दर्जेदार वीजपुरवठा होण्यास मदत होईल, असं प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून कळविण्यात आलं आहे.

नक्षली आत्मसमर्पण

कंपनी क्रमांक १० च्या सेक्शन कमांडर असलेल्या दोन जहाल नक्षली महिलांनी आज पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं.  बाली उर्फ रामबत्ती उर्फ झरिना नरोटे आणि शशिकला उर्फ चंद्रकला उर्फ सुनंदा उर्फ मनिषा उईके अशी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलींची नावं आहेत. बाली नरोटे ही २०१० पासून नक्षल दलामध्ये कार्यरत होती. तिच्यावर २१ गुन्ह्यांची नोंद आहे. तर शशिकला उईके ही २०११ पासून कार्यरत असून, तिच्यावर ८ गुन्ह्यांची नोद आहे. दोघींवर प्रत्येकी ८ लाख असे एकूण १६ लाख रुपयांचे बक्षीस होते. २०२२ पासून आतापर्यंत १९ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, नक्षल्यांनी हिंसेचा मार्ग सोडून आत्मसमर्पण करुन स्वाभिमानाचं  जीवन जगावं, असं आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केलं आहे.

गोहत्या बंद

मध्यप्रदेश मधील सिवनी इथं आठवड्याभरापुर्वी 54 गायींची हत्या करून मृतदेह फेकण्यात आले होते. या घटनेचा मध्यप्रदेश राज्यात सर्वत्र विरोध करण्यात आला होता. तर मध्यप्रदेश राज्याच्या सीमेलगत असलेल्या गोंदियात देखील या घटनेचा विरोध दर्शविण्यात आला आहे. आज या गौहत्येच्या निषेधार्थ तिरोडा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. त्यानंतर देशात गौहत्या थांबविण्यात याव्या  तसेच गौहत्या करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीनं तहसीलदारांमार्फत राष्ट्रपतींना पाठविण्यात आलं आहे.

कुपोषणमुक्त गडचिरोली

कुपोषणमुक्त गडचिरोली करीता राबविण्यात येत असलेल्या ‘कवसेर’ या उपक्रमात मागील 30 दिवसांचा आढावा घेण्यात आला असता तीव्र कुपोषित श्रेणीतील जिल्हयातील एकुण 615 कुपोषीत बालकांपैकी 177 बालकांमध्ये सुधारणा घडुन आली असून 167 दुर्धर आजारी बालकांपैकी 74 बालकांवर उपचार करण्यात आले असल्याचा अहवाल जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाने सादर केला आहे. कुपोषण मुक्त गडचिरोली करीता प्रोजेक्ट कवसेर, दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. ज्यामध्ये वजनानुसार तीव्र व मध्यम या कुपोषीत श्रेणीमधुन बालकांना मुक्त करण्याचे उद्‌दिष्ट आहे.

******